# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. माअधि/अपिल/१०/२०१८
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.
दि.०८/०२/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री.कृष्णा सी.गुप्ता, ....... **अपिलार्थी**
एस/१०६, पटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.),
ठाणे. ४०११०१

**विरुध्द**

जनमाहिती अधिकारी तथा ....... **प्रतिवादी**
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**-: विवेचन :-**

श्री.कृष्णा सी.गुप्ता, भाईदर (पुर्व) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.१३/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) आपल्या पालिकेत कार्यरत दिपाली पांडुरंग पवार यांचा भरती प्रक्रियेबाबत आपल्याकडे असलेले सर्व कागदपत्रे, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका देण्यात यावा.

२) समाजविकास अधिकारी या पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीच्या प्रती देण्यात यावा व शासनाची नियमावली द्यावी.

३) सदर भरती बाबत देण्यात आलेल्या जाहिराती, महासभेचा ठराव व आपल्या विभागाने दिलेली आदेश पत्राची सत्यप्रत द्यावी.

४) शैक्षणिक कागदपत्रे सत्यप्रत करुन द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणेः-**

मागितलेली माहिती दिलेली नसल्याने अपीलार्थी यांनी दि.१५/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु सदर अपिल हे दि.२९/०१/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

**सुनावणीचा तपशिलः-**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०८/०२/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ/आस्था/२१३/२०१७-१८ दि.०३/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवादः- माझ्या दि.१३/१२/२०१७ रोजीच्या अर्जाप्रमाणे आस्थापना विभागाकडून माहिती देण्यात आली नाही.

२) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवादः- अपिलार्थी अर्जदार यांना अभिलेखाचा शोध घेऊन माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी अर्जदारास अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. सबब, उपरोक्त अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतिः-**

१) श्री.कृष्णा सी.गुप्ता,
एस/१०६, पटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.),
ठाणे. ४०११०१

०८/०२/१८

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

9/2/2018

३) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय